# पंडित जवाहरलाल

# यांचा

# पोवाडा



हा हिंदभूमिचा लाल । **जवाहरलाल** । तरुणांचा खरा आदर्श त्यच तेजाळ । स्वार्थाचा करुनिया होम पेटवी जाळ । तरुणांचं रक्त सळसळे । भीति दूर पळे । शत्रु थरथरवि जणुं काय काळ । **पांडुरंग** शाहीर त्याचं कवन गाणार ॥ जी ॥

● ●

### चौक १ ला

१९२९ सालाला । डिसेंबरच्या २७ तारखेला । राष्ट्रीय सभा लाहोरला । जवाहरलाल अध्यक्ष झाले लढा देण्याला ॥ संपूर्ण स्वातंत्र्य मंत्र दिला सर्वांला ॥ कायद्यांचा भंग करण्याचा आदेश दिला ॥ एप्रिलच्या १० व्या तारखेला । जवाहरलाल नेहरूनीं कायदेभंग सुरू केला ॥ मीठ तयार केलं प्रयागाला । तंवा कैद केलं वीराला । हा देशाचा अपमान झाला । दांडी यात्रा केली महात्म्यानं कायदा मोडण्याला ॥ ॥ चाल ॥ फोफावली फार चळवळ । तिनं व्यापलं गांवोगांव सारं ॥जी॥ मग समेट करी सरकार । विजयानं शोभे जवाहर ॥ जी ॥ अध्यक्षपदाची माळ शोभे वीराला ॥ धाडसी राजकारणी झाला बोलबाला ॥ त्यागांत हार जाईना वीर कोणाला ॥ त्यानं मनं जिंकून लोक आपलासा केला ॥ जी ॥ भारताचं भाग्य उज्ज्वल । म्हणून प्रेमळ । जवाहरलाल ।

लाभले आज पुढारी खास। **महात्मा गांधी** सद्गुरु ज्यास। वंदन करितों आज मी त्यास ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

युद्धाचा वणवा पेटला। भारतांत दडपशाहीनं नंगानाच केला। महात्म्यानं राज्यकर्त्यांना इषारा दिला। 'हिंदुस्थान सोडून चला'। तंवा सरकारनं पकडलं सर्वांला। जवाहरलाल गेले तुरुंगाला। महात्माजी गेले तुरुंगाला। असा कांहीं काळ मग गेला। १९४२ वर्ष गाजलं त्या वेळा। सुभाषचंद्र करती चढाईला। असंतोष माजुन गेला। तंवा हिंदुस्थानचं समाधान करण्याला। **वेव्हेल साहेब** आले भारताला ॥ अन् बंधमुक्त केलं सर्वांला। हंगामी सरकार स्थापलं राज्य करण्याला ॥ उपाध्यक्षपद मानाचं जवाहराला। सरदार पटेल मदतीला। राजेंद्र अन्न देण्याला। असा राष्ट्राचा संसार मांडला। स्वातंत्र्यसूर्य उदयाला। आतां येणार शंका ना मला। जवाहर धुरा वाहण्याला। एशियाटिक परिषद त्यांनीं भरविली दिल्लीला। परिषद झाली थाटानं पुराणा किल्ल्याला। साऱ्या राष्ट्रांनीं धन्यवाद दिले जवाहरलालाला ॥ अध्यक्षपद समितीचं त्यांनीं दिलं त्याला ॥ असा भारतमातेचा पुत्र वंद्य जगताला ॥ जी ॥ आणीबाणीचा काळ राष्ट्राला। अशा वेळीं धुरा वाहण्याला। जवाहरलाल लाभले आपणाला। अभिमान वाटतो हा मला। सुखशांति साऱ्या दुनियेला। लाभेल शंका नाहीं मला। **पांडुरंग** शाहीर आला कवन करण्याला ॥ २ ॥

रचना- १-७-४७.